**प्रेस नोट दिनांक - ०५/०७/२०१८**

---

**सारसबाग चौपाटी येथे घडलेल्या जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या १ महीन्यापासुन फरार आरोपीस पकडण्यास खडक पोलीसांना यश**

---

दिनांक ०४/०७/२०१८ रोजी खडक पोलीस ठाणे कडील सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव पवार, पोलीस हवालदार विनोद जाधव, पोलीस शिपाई रवि लोखंडे, पोलीस शिपाई अशिष चव्हाण असे खडक पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना पोलीस शिपाई आशीष चव्हाण यांना त्याचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, इसम नामे केदार खंडागळे व राजेश कसबे हे स्वारगेट पोलीस ठाणे कडील एका हाफ मर्डरच्या गुन्हयात फरारी असुन ते आत्ता सध्या करिश्मा हॉटेल, वडकीनाला हडपसर पुणे येथे येणार आहेत. त्यापैकी केदार खंडागळे याने अंगात पोपटी रंगाचा टी शर्ट व केसरी रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. तसेच सतिश कसबे याने अंगात पांढ-या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. वैगेरे मजकुराची माहिती प्राप्त होताच सदर बाबत वरिष्ठांना कळवुन वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांचे मार्गदर्शनखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव पवार यांनी वरील स्टाफसह आपआपले खाजगी वाहनावरुन सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन मिळालेल्या बातमीतील वरील वर्णनाप्रमाणे दोन इसम करिश्मा हॉटेलचे बाहेर उभे राहिलेले दिसले. सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव पवार यांनी सोबतचं स्टाफचे मदतीने चारही बाजूने घेराव घालून त्यांना रात्रौ २१.१५ वा. चे. सुमारास ताब्यात घेतले त्यांना त्याचे नाव व पत्ता विचारता अंगामध्ये पोपटी रंगाचा टी शर्ट घातलेल्या इसमाने आपले नाव १) **केदार संजय खंडागळे, वय - १७ वर्षे रा. पीएमसी कॉलनी नं. ९, जी/९२, घोरपडे पेठ पुणे** व अंगामध्ये पांढ-या रंगाचे शर्ट घातलेल्या इसमाने आपले नाव २) **राजेश सतिश कसबे वय - १९ वर्षे रा. ५४ सीपी/ लोहियानगर, अंजुमन मस्जिदजवळ पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यांना विश्वासात घेवुन तपास करता त्यांनी सुमारे १ महिन्यापुर्वी सारसबाग चौपाटी येथे मुलगा नामे विकास गोविंद कांबळे यास मारहाण केली असल्याचे सांगितले.

सदर बाबत अधिक चौकशी करता आपले पोलीस ठाणेस गु. र. नं. २००/२०१८ भा.द. वि. कलम ३०७,१४३, १४४, १४७, १४८, १४९, आर्म ॲक्ट ४ सह २५, ५०४, फौजदारी कायदा दुसरी सुधारणा १९८३ कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल असुन ते सदर गुन्हयात पाहिजे आरोपी आहेत.

सदर ताब्यात घेतलेला विधीसंघर्षीत बालक केदार संजय खंडागळे व आरोपी नामे राजेश सतिश कसबे यास पुढील कार्यवाही कामी स्वारगेट पोलीस ठाणेकडे ताब्यात देणेत आले आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे मा. पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस ठाणे पुणे चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. वैभव पवार व पोलीस हवालदार विनोद जाधव, पोलीस शिपाई रवि लोखंडे, पोलीस शिपाई अशिष चव्हाण यांनी केलेली आहे.